Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ** - १. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना जा. क्र.१२३६ / दि.३१ जूलै, २०२० व त्यामधील संदर्भ क्र. १ ते ११ पत्र व परिपत्रक

२. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.

३. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय जा. क्र. नैआ/कोरोना विषाणू आरआर /७५५/२०२० दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.

४. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३ दि. १८ सप्टेंबर, २०२०

५. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना जा. क्र.१३९८ / दि. १८ सप्टेंबर, २०२०

६. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३ दि. २१ सप्टेंबर, २०२०

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानूसार उपरोक्त संदर्भीय क्र. ५ परिपत्रकाअन्वये विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १००% उपस्थिती राहणेबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु उपरोक्त संदर्भीय क्र.६ शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमधील परीक्षा व परीक्षेच्या कामकाजाशी संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची **उपस्थिती आवश्यक** असणार आहे. सदर उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहिल.

२. विद्यापीठातील सर्व वर्ग १ व वर्ग २ मधील कर्मचारी नियमितपणे प्रत्यक्ष कार्यालयात **(१००%)** उपस्थित राहतील.

३. सर्व वर्ग १ व वर्ग २ मधील व परीक्षा व परीक्षेच्या कामकाजाशी संबंधित कर्मचारी वगळता उर्वरित सेवकांची **५०%** याप्रमाणे सेवकांना आळीपाळीने (Rotation) प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहतील. तसेच विभाग प्रमुख यांना उर्वरित सेवकांची सेवा आवश्यक वाटल्यास त्यानूसार त्यांनी संबधित सेवकांना बोलविल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित रहावे. याचे नियोजन संबधित विभाग प्रमुख यांनी करावे. ज्या कर्मचा-यांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळालेली आहे त्यांनी घरी राहून (Work from Home) कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये. उपरोक्त नूसार संबधित विभाग प्रमुख यांनी विभागातील प्रत्येक अधिकारी / सेवक कार्यालयात उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

४. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये (सुरक्षा विभाग, आरोग्य विभाग, व अभियांत्रिकी विभागअतंर्गत असलेली अत्यावश्यक सेवा) आवश्यकतेनूसार पूर्ण क्षमतेने सुरु राहतील.

५. उपरोक्त प्रमाणे व आवश्यकतेनूसार विभागप्रमुख यांच्या आदेशानुसार सदर कर्मचारी यांनी कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.

६. उपस्थित सर्व कर्मचारी यांनी शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

७. सदर आदेश पुढील आदेश निर्गमित होई पर्यंत लागू राहतील.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 1467
दि. 22 SEP 2020
**प्रति,**

१) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य / संचालक
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत स्पष्टीकरणात्मक खुलासा.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २१ सप्टेंबर, २०२०.

**संदर्भः** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३, दिनांक १८ सप्टेंबर, २०२०.

**प्रस्तावनाः-**

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. याबाबत विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटनांकडून निवेदने प्राप्त झाली आहेत. त्यामुळे याबाबत शासन स्तरावरुन स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्यात येत आहेः-

(१) संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये परीक्षा व परीक्षेच्या कामाकाजाशी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणार आहे. तथापि, सदर उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहिल.
(२) परीक्षा व परीक्षेशी संबंधित कामाकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठे/ महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर गरजेनुसार निर्णय घ्यावा. यासंदर्भात सर्व संबंधित विद्यापीठांनी/ शैक्षणिक संस्थांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी.

२.      सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००९२११७३५३५२६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pravinkumar Gulabrao Pawar

Digitally signed by Pravinkumar Gulabrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8de261729f06eda4a56aba947eceb6140d7406426b2f08c9317bea2458ec1f92, serialNumber=8f18625adb482a7ee2512cea93ce697388c95a99c89e41e85c05a3de8476488f, cn=Pravinkumar Gulabrao Pawar
Date: 2020.09.21 17:38:13 +05'30'

**( प्रविणकुमार पवार )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई
९) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
१०) मा.कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे
११) मा.कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१२) मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१३) मा.कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१४) मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१५) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे
१६) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१७) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१८) निवडनस्ती (विशि-३).

Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## प रि प त्र क

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ-** १. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. आस्थापना जा. क्र.१२३६ / दि.३१ जूलै, २०२० व त्यामधील संदर्भ क्र. १ ते ११ पत्र व परिपत्रक
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.
३. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय जा. क्र. नैआ/कोरोना विषाणू आरआर /७५५/२०२० दिनांक ३१ ऑगस्ट,२०२०.
४. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३ दि. १८ सप्टेंबर, २०२०

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या/ अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येत असल्याने उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या/ अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येत असल्याने विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यापुढे निर्धारित वेळेनूसार १००% उपस्थिती राहिल.

२. उपस्थित सर्व कर्मचारी यांनी शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. (सोबत परिशिष्ट -१ माहितीसाठी)

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** १३९८
**दि.** 18 SEP 2020
**प्रति,**

१) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य / संचालक
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.